सन २०१७-१८ च्या टंचाई अंतर्गत दर्यापुर अंजनगाव व भातकुली तालुक्यातील १५६ गांवे व २ शहरे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील रामतिर्थ ते नांदरुण दरम्यानच्या पाईपलाईनच्या विशेष दुरुस्ती प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र. ४३ /पापु १४
जी. टी. रुग्णालय संकुल इमारत, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: ०६ मार्च, २०१८

वाचा -

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक: टंचाई १०९९/प्र.क्र. १२/पापु १४, दिनांक ३.२.१९९९

२) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक: टंचाई २०१६/प्र.क्र.१४३/पापु १४, दिनांक ४.५.२०१६

३) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे क्रमांक जा.क्र. उपआ/विकास/पाणी टंचाई/अका/ कावि/२३०/१८, दिनांक १२.०२.२०१८ चे पत्र.

४) शासन पत्र क्रमांक बैठक २०१७/प्र.क्र. १७० /पापु १४, दिनांक ०१.०३.२०१८ (बैठकीचे इतिवृत्त)

प्रस्तावना -

विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सन २०१७-१८ च्या टंचाई कालावधीसाठी तातडीच्या पाणी पुरवठा योजनेंतर्गत दर्यापूर, अंजनगाव व भातकुली तालुक्यातील १५६ गांवे व २ शहरी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या नांदरुण प्रभातील नांदरुण ते रामतिर्थ पर्यंत अस्तिवातील २०० मी. मी. व्यासाच्या ए.सी. पाईप लाईन ऐवजी २०० मी.मी. व्यासाची डी.आय.के-७ पाईप लाईन टाकणे या कामाचा टंचाई अंतर्गत विशेष दुरुस्तीचा रुपये १,४०,०९,०८०/- किंमतीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना / उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या स्थायी समितीच्या दिनांक ०१.०३.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत मान्यतेसाठी विचारात घेण्यात आला.

अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या स्थायी समितीच्या दिनांक ०१.०३.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन योजनेच्या प्रस्तावात आकारण्यात आलेल्या १७.५ % ऐवजी ४ % ईटीपी (ETP) चार्जेस देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार योजनेच्या रु. १,२३,९९,५२५/- इतक्या किंमतीच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात आली. त्या अनुषंगाने सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

विभागीय आयुक्त, अमरावती यांनी अमरावती जिल्हयातील दर्यापुर, अंजनगाव व भातकुली तालुक्यातील १५६ गांवे व २ शहरे प्रादेशिक पाणी पुरवठा नळ योजनेच्या विशेष दुरुस्तीस प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र. ३ च्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावात नमुद दर्यापुर, अंजनगाव व भातकुली तालुक्यातील १५६ गांवे व २ शहरे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या विशेष दुरुस्तीच्या रुपये १,२३,९९,५२५/- (रुपये एक कोटी तेवीस लाख नव्याण्णाव हजार पाचशे पंचवीस फक्त) इतक्या किंमतीच्या प्रस्तावास स्थायी समितीने दिनांक ०१ मार्च, २०१८ च्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने या आदेशान्वये दर्यापुर तालुक्यातील १५६ गांवे व २ शहरे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील नांदरुण प्रभागातील रामतिर्थ ते नांदरुण दरम्यानच्या नळ योजनेच्या विशेष दुरुस्तीच्या प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दर्यापुर तालुक्यातील संबंधित गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याचे सर्वप्रथम घोषित करावी.

२) सदर प्रस्तावात नमूद केलेली दर्यापुर तालुक्यातील रामतिर्थ ते नांदरुण दरम्यानच्या पाणी पुरवठा योजनेच्या पाईप लाईनच्या विशेष दुरुस्तीची कामे कार्यकारी अभियंता (जलव्यवस्थापन), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती यांचेमार्फत राबविण्यात यावी.

३) सदर योजनेची कामे विहित पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येऊन करावीत. योजनेचे काम मान्यता प्राप्त किंमतीमध्येच पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

४) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, अमरावती यांच्या दिनांक ३०/११/२०१७ च्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटींचे पालन करावे.

५) योजनेची निविदा अल्प मुदतीची (७ दिवस) काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.

६) निविदा प्रक्रीया दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत पूर्ण करुन कार्यारंभ आदेश देणे आवश्यक आहे. निविदा प्रक्रीया दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत पूर्ण न झाल्यास योजनेची मान्यता रद्द समजण्यात येईल.

७) योजनेची कामे दिनांक ३० एप्रिल, २०१८ पर्यंत पूर्ण करुन योजनेतून पाणी पुरवठा सुरु होणे आवश्यक आहे. तथापि, या दिनांकापर्यंत योजनेतून पाणी पुरवठा सुरु न

झाल्यास योजनेची मान्यता रद्द करण्यात येईल.

८) विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सदर योजनेकरिता निविदा प्रक्रिया झाल्यानंतर योजनेच्या सुरुवातीला ५०% इतका निधी द्यावा. उर्वरित निधी योजना कार्यान्वित झाल्यानंतर देण्यात यावा.

९) योजनेचे काम मुदतीत पूर्ण होणे आवश्यक असल्याने योजनेच्या निविदा प्रक्रीयेपासून ते योजनेतून पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत आठवडयाच्या प्रत्येक सोमवारी प्रगती अहवाल शासनास पाठविण्यात यावा

२. याबाबत होणारा खर्च मागणी क्र. सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१- अवर्षण, १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ९१ - राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१)(०१) पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (अनिवार्य) (२२४५००९३) (दत्तमत) (वेतनेत्तर) - ३१, सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखालील तरतूदीमधून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना / उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या सचिवस्तरीय स्थायी समितीच्या दिनांक ०१.०३.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०११९१९३४४५२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahesh Bhagwan Sawant

Digitally signed by Mahesh Bhagwan Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d1f670a17d77c8ddff69694de2a07b7ff855dafef954aefa82ca28bd6cc6adb6, cn=Mahesh Bhagwan Sawant
Date: 2018.03.06 17:14:04 +05'30'

(महेश सावंत)
उप सचिव , महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई

२. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
३. अपर मुख्य सचिव, (म.व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
८. विभागीय आयुक्त, अमरावती
९. जिल्हाधिकारी, अमरावती
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती
११. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती
१२. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती
१३. कार्यकारी अभियंता (जलव्यवस्थापन),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती
१४. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, अमरावती
१५. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१६. उप सचिव (पापु १४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१७. पापु १४ (निवडनस्ती)